पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालय,
चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे 411 008
दूरध्वनी क्रमांक 020-25657878 फॅक्स क्र. 020-25674641
ई मेल sp.pune.r@mahapolice.gov.in संकेतस्थळ www.punaruralpolice.gov.in

जा.क्र. आस्था.१/पोशि/भ.१९/नियुक्ती आदेश क्र. ०१/20765/२०२१ पुणे, दिनांक ०९/१२/२०२१

संदर्भ :- महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११

विषय :- <u>पोलीस शिपाई भरती- २०१९.</u>

पोलीस शिपाई पदावर स्थानिक व तात्पुरत्या स्वरुपात नेमणुकीबाबत...

*****

## <u>नियुक्ती आदेश :-</u>

पोलीस शिपाई भरती सन २०१९ मध्ये पोलीस शिपाई पदासाठी पात्र ठरलेल्या खालील नमूद पुरुष व महिला उमेदवारांची निवड होऊन, सदरहू उमेदवार हे वैद्यकिय तपासणी तसेच चारित्र्य पडताळणी व पूर्व इतिहास पडताळणी मध्ये पोलीस शिपाई पदावर नियुक्तीसाठी पात्र ठरलेले आहेत.

त्या अनुषंगाने खालील उमेदवारांना पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण या घटकाचे आस्थापनेवर "पोलीस शिपाई पदावर (गट-क)" या संवर्गात महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ अन्वये (१) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वेपुर-२०१८/प्र.क्र.४४/सेवा-९, दि.०१/०१/२०१९, (२) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, अधिसूचना क्र. वेपुर-२०१९/प्र.क्र.१/सेवा-९, दि.३०/०१/२०१९ व (३) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्र. वेपुर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९, दि.२०/०२/२०१९ नुसार (एस-७) ₹ २१,७००/- या मूळ वेतन व शासनाच्या प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या इतर भत्यासह पोलीस मुख्यालय, पाषाण रोड, चव्हाणनगर, पुणे येथे दि. १०/१२/२०२१ रोजी पासून खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीचे अधीन राहून अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यांत येत आहे.

| अ.क्र. | चेस्ट नं. | उमेदवारांची नावे | लिंग | प्रवर्ग | निवड प्रवर्ग | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 026 | विकास देवेंद्र साळुंखे | M | खुला | खुला | पुरुष |
| 2. | 080 | प्रविण दिपक नितनवरे | M | SC | खुला | पुरुष |
| 3. | 066 | अनिल गोरक्षनाथ थोरात | M | OBC | खुला | पुरुष |
| 4. | 076 | ईश्वर रावसाहेब चव्हाण | M | EWS | खुला | पुरुष |
| 5. | 131 | अजय सर्जेराव चव्हाण | M | खुला | खुला | माजी सैनिक |
| 6. | 088 | काजल संग्राम कांबळे | F | SC | खुला | महिला |
| 7. | 053 | अभिजीत विलास कांबळे | M | SC | SC | पुरुष |
| 8. | 103 | ललीत मनोहर पद्मनारायण | M | SC | SC | पुरुष |
| 9. | 089 | आरती भगीरथ खडे | F | SC | SC | महिला- |

<u>अटी व शर्ती खालील प्रमाणे :-</u>

१. सदरची नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची राहील.

२. महाराष्ट्र शासन, सा. प्र. वि.,शा. नि. क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि.१२-१२-२०११ नुसार जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचे अधीन राहून निव्वळ तात्पुरती नियुक्ती करण्यात देत आहे.

३. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर आपण नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ०६ महिन्यांचे आंत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. आपण नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोहोच पावतीची साक्षांकित प्रत या कार्यालयास सादर करावी. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार संबंधित जात पडताळणी समितीने उमेदवाराचे पडताळणीचे प्रस्ताव ०६ महिन्याचे आंत निकाली काढावेत. जात पडताळणी समितीने आपले जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर तुम्हांस दिलेला नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यांत येईल व तुमच्याविरुध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम,२००० यातील तरतुदीनुसार तुमच्याविरुध्द त्वरीत कारवाई करण्यांत येईल.

४. याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचिकावर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या, औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २५ ऑगस्ट, २०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यांत आली आहे. यावर मा.सर्वोच्च न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्या अधीन राहून सदर नियुक्ती आदेश राहील.

५. पोलीस शिपाई पदावर तात्पुरत्या व अस्थायी स्वरुपात नियुक्ती दिल्यानंतर भविष्यांत चारित्र्य पडताळणी अहवाला संदर्भात प्रतिकूल फेर अहवाल प्राप्त झाल्यास, संबंधित उमेदवारांची सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल.

६. प्रशिक्षण कालावधीत नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना दुखापत झाल्यास, त्याबद्दल ते कोणत्याही प्रकारच्या नुकसान भरपाईस पात्र राहणार नाहीत.

७. प्रशिक्षण कालावधीत /अस्थायी सेवेत नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपायांत दोष आढळल्यास किंवा कोणतेही बेशिस्त, गैरवर्तन किंवा नितीमूल्यांचा ऱ्हास करणारे अशोभनीय कृत्य केल्यास,पोलीस सेवेत स्वारस्य न दाखविल्यास किंवा प्रशिक्षण कालावधीत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगी शिवाय गैरहजर राहिल्यास, त्यांना कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना / नोटीस न देता, त्यांची सेवा समाप्त (Terminate) करण्यांत येईल.

८. पुणे ग्रामीण पोलीस घटकाचे आस्थापनेवर नियुक्ती दिल्यानंतर, बेशिस्त/गैरवर्तन किंवा गंभीर स्वरुपाची कसुरी निदर्शनास आल्यास, त्यांची या घटकाचे कार्यक्षेत्राबाहेर इतर कोणत्याही घटकांत कोठेही व केव्हाही बदलीस पात्र होईल.

९. पोलीस शिपाई पदाचा राजीनामा दिल्यास, पुर्ननियुक्तीबाबत कोणताही विचार केला जाणार नाही.

१०. ज्या संवर्गातून-जातीच्या प्रवर्गातून पोलीस शिपाई पदी भरती झाली आहे तो संवर्ग / प्रवर्ग नंतर बदलता येणार नाही.

११. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११ मधील नियम, ११ नुसार पुणे ग्रामीण पोलीस घटकांत पोलीस शिपाई पदी नियुक्ती झाल्यानंतर इतर पोलीस घटकांत कोणत्याही कारणास्तव बदली केली जाणार नाही.

१२. पोलीस शिपाई या पदावर रुजू झाल्या तारखेपासून तीन महिन्याचे आंत उमेदवारांने महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि. शा.नि. क्र.सीआर-१०७९/२०५१/२२३/११, दिनांक २०/११/१९८० नुसार विहीत केलेले मत्ता व दायित्व (Assets and Liabilities) बाबतचे विवरणपत्र स्वत:हून भरुन संबंधित आस्थापनेस सादर करणे बंधनकारक राहील.

१३. शासन निर्णय क्र.अंनियो-२००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ अन्वये दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर शासकीय सेवेत नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागू ठरेल. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी योजना आपणांस लागू होणार नाही.

१४. शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही-२०००/प्रक्र-१७/२०००/बारा, दिनांक २८ मार्च, २००५ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ मधील नियम, ४ नमुना-अ नुसार हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे अनर्ह ठरविण्यास पात्र ठरतील, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

१५. महाराष्ट्र शासन, गृहविभाग पत्र क्र.पोलसवो-३११/प्र.क्र.५२१/पोल-५अ, दिनांक २६.०९-२०११ व अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके,म.रा.मुंबई यांच्याकडील पत्र क्र.प्रशि/पोशि-भरती/प्रशि खर्च वसुली /२०१२ / २२३१, दि. २६ एप्रिल, २०१२ अन्वये नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ट पोलीस शिपायाने प्रशिक्षण कालावधीत अथवा त्यांचे प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील ०३ वर्षांत पोलीस शिपाई पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास या सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यांस विनंती केल्यास त्या उमेदवाराकडून त्यांना प्रशिक्षण कालावधीत अदा केलेले वेतन व भत्ते तसेच त्या उमेदवाराने जितक्या महिने प्रशिक्षण घेतले आहे, त्याचा प्रशिक्षण खर्च म्हणून प्रती महिना ₹ २०००/- (प्रती मासिक ₹ दोन हजार फक्त) इतका प्रशिक्षणावरील खर्च वसूल करण्यांत येईल व सदरची रोख रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यांत येईल, याबाबतचे हमीपत्र देणे आपणांस बंधनकारक आहे.

१६. पोलीस शिपाई पदावर आपली नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने कोणतेही कारण न देता मुंबई पोलीस नियमावली, १९५९, भाग-१ मधील नियम क्र.७८ (१) (v) ते (viii) अन्वये आपली सेवा केव्हाही समाप्त करण्यांत येईल.

१७. पोलीस शिपाई पदासाठी शासनाने विहित केलेले मूलभूत पोलीस प्रशिक्षण संबंधित पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये पूर्ण करण्यांत टाळाटाळ केल्यास, पोलीस प्रशिक्षणांत / प्रशिक्षण पूर्ण करण्यांत स्वारस्य न दाखविल्यास अथवा प्रशिक्षणांस गैरहजर राहिल्यास / भगोडा झाल्यास, महाराष्ट्र पोलीस नियमावली, १९९९ भाग-१, मधील नियम, ७८ उपनियम (१) मधील VIII खालील टीप नुसार तुमची सेवा समाप्त करण्यांत (Terminate from Service) येईल.

१८. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११ मधील नियम, १२ अन्वये नवप्रविष्ट पोलीस शिपाई पदासाठी विहित केलेले मुलभूत प्रशिक्षण पूर्ण करणे बंधनकारक राहील व सदर प्रशिक्षणांती घेण्यांत येणारी ही परीक्षा ०४ संधीमध्ये उत्तीर्ण व्हावी लागेल. जर त्यांनी ०४ संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण केली नाही तर त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. या कालावधीमध्ये त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

१९. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम,२०१६ नुसार महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम,२०११ या मुख्य नियमा मधील नियम-३(१)(क) नंतर उपखंड (ड) समाविष्ठ करण्यांत आलेला असून, त्यानुसार अन्य अर्हता म्हणून पोलीस भरती मध्ये पोलीस शिपाई पदाकरीता अर्ज करणा-या उमेदवाराने मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलम २ (२१) नुसार हलकी वाहने चालविण्याचा (L.M.V.) परवाना धारण करणे बंधनकारक राहील. परंतु, सदर परवाना धारण न करणाऱ्या उमेदवाराने नियुक्तीनंतर त्यांचे पोलीस प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर दोन वर्षाच्या आत परवाना धारण करण्यात यावा. जर या कालावधीत हलकी वाहने चालविण्याचा परवाना धारण न केल्यास, पोलीस शिपाई पदासाठीची निवड रद्द ठरवून सेवा समाप्त करण्यात येईल.

२०. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश)(सुधारणा) नियम, २०१६ नुसार महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ या मुख्य नियमा मधील नियम-१२ नंतर नियम १३ अंतर्भूत करण्यांत आलेला असून, त्यानुसार पोलीस शिपाई पदावर नियुक्त व्यक्तीने शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून वेळोवेळी विहित करण्यांत येणारे, संगणक हाताळणी बाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

२१. आपणांस महाराष्ट्र शासन नियमानुसार हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण व्हाव्या लागतील.

२२. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११ मधील नियम, १३ नुसार ...
मुंबई पोलीस नियमावली, १९५९, मुंबई पोलीस (शिस्त व अपिल) नियम, १९५६ व महाराष्ट्र ...
(सेवाप्रवेश) नियम, २०११ तसेच महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहीत केलेले अन्य नियम लागू होतील.

२३. उमेदवारांस कर्तव्यावर रुजू होतेवेळी भारतीय राज्य घटनेतील संघराज्याशी एकनिष्ठ राहाण्याबाबत लेखी शपथ ... लागेल. तसे करणे बंधनकारक राहील.

२४. पोलीस पडताळणीत किंवा त्यानंतर केव्हाही आपली शैक्षणिक प्रमाणपत्रे, जातीचे प्रमाणपत्रे व इतर प्रमाणपत्रे ... कोणतीही वस्तुस्थिती निदर्शक माहिती दडपून ठेवल्याचे अथवा खोटी माहिती दिल्याचे आढळून आल्यास आप... सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल, याबाबत नोंद घ्यावी.

२५. पोलीस प्रशिक्षण कालावधीत अथवा त्यानंतर केव्हाही वाहन चालकाचे प्रशिक्षण दिल्यानंतर नेमून दिलेल्या ठिकाणी वाहन चालकाचे कर्तव्य पार पाडावे लागेल.

२६. नवप्रविष्ठ पोलीस शिपाई पदावर नियुक्ती दिल्यांनतर आपणांस पुढील उच्चशिक्षण अथवा इतर विभागा नियुक्तीसाठी परिक्षा द्यावयाची असल्यास त्या परिक्षेस बसण्यासाठी अर्ज करणेपूर्वी त्यांनी या कार्यालयाच पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

२७ पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्रमांक पोमसं/६/पो.कर्म बदल्या-धोरण/२३६/२०१८, दिनांक १६/०७/२०१८ अन्वये तेथील चालकाचे कर्तव्य पार पाडण्यांसाठी ०५ वर्षाचा कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे कर्तव्य पार पाडणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

२८. पोलीस महासंचालक, म. रा. मुंबई यांचेकडील अन्वये जा. क्र.पोमसं/६/१०/पो.शि.भरती/सेवाज्येष्ठता/२५१/२०१२, दिनांक १७/०८/२०१३ अन्वयेचा स्थायी आदेश क्र.२२/२०१३ मधील तरतुदीनुसार सेवाज्येष्ठता निश्चित करण्यांत येईल.

२९. नियुक्ती आदेशातील जे उमेदवार सध्या शासकीय-निमशासकीय सेवेत कार्यरत आहेत, अशा उमेदवारांनी त्यांच्या सेवेचा राजीनामा मंजूरीबाबतचे आदेश व कार्यमुक्तीचे आदेश या कार्यालयास सादर केल्यानंतरच, त्यांना या आस्थापनेवर हजर करुन घेण्यांत येईल.

३०. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम ७४ नुसार नियुक्ती दिलेल्या महिला उमेदवार यांना कमीत कमी एक वर्ष सतत सेवा पूर्ण झाल्यानंतर प्रसूती रजेस पात्र राहतील.

३१. महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि.,शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१८/व्ही.आय.पी.६७/प्र.क्र.२०७/कार्या.१२, दि. २८/०५/२०१८ व महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२ मधील तरतुदीनुसार नियुक्ती आदेश निर्गमित झाल्या दिनांकापासून ३० दिवसांचे आंत संबंधित उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणे आवश्यक आहे. सदर कालावधीत नियुक्ती झालेला उमेदवार हजर न झाल्यास, असा उमेदवार नोकरीची संधी गमावेल व त्याचे नियुक्तीचे आदेश रद्द करण्यांत येतील. यासाठी उमेदवारांकडून देण्यात येणाऱ्या कारणाचा / विनंतीचा विचार केला जाणार नाही, याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(डॉ.अभिनव देशमुख) भा.पो.से.
पोलीस अधीक्षक,पुणे ग्रामीण.

प्रति :- उपरोक्त संबंधित उमेदवार
मार्फत-राखीव पोलीस निरीक्षक, मुख्यालय, पुणे ग्रामीण

**प्रत :- राखीव पोलीस निरीक्षक, मुख्यालय, पुणे ग्रामीण**

२/- सदरचे आदेश मुख्यालयाच्या नोटीस बोर्डावर त्वरीत डकविण्यात यावे. तसेच वर नमूद नवप्रविष्ट पोलीस शिपाई यांची कर्तव्यावर हजर झाल्याची दिनांक इकडील कार्यालयास कळविण्यात यावे. तसेच जे नवप्रविष्ट पोलीस शिपाई कर्तव्यावर हजर झालेले नाहीत त्यांची नावेही इकडील कार्यालयास सादर करावीत.

३/- कर्तव्यावर हजर झालेल्या सर्व नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना किटपेटी व इतर सरकारी सरंजाम अदा करावा.

४/- वर नमूद सर्व नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांचे स्टेट बँक ऑफ इंडीया, कोषागार शाखा,पुणे या बँकेत खाते उघडण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी.

**प्रत :- प्रमुख लिपीक, लेखा शाखा पुणे ग्रामीण**

२/-शा.नि.क्र. अंनियो १००५५-१२६-सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५ अन्वये वर नमुद नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांची दि. ०१ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय सेवेत नियुक्ती झाल्याने त्यांचे नवीन "परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना" अंतर्गत विहीत नमुन्यातील फॉर्म त्वरीत भरुन घ्यावेत. सदर नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना लवकरच मूलभूत प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येणार आहे.

**प्रत :- प्रभारी अधिकारी, नियंत्रण कक्ष, पुणे ग्रामीण**

२/- वरील प्रमाणे नियुक्तीचे आदेश त्वरीत www.puneruralpolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे तसेच वर नमूद उमेदवार यांनी रापोनि, मुख्यालय, पुणे ग्रामीण या ठिकाणी दि. १०/१२/२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता किटपेटी आणि इतर सरंजाम घेणेकामी न चुकता उपस्थित राहावे, असेही कळविण्यात यावे.

प्रत :- अपर पोलीस अधिक्षक, पुणे विभाग / बारामती विभाग, पुणे ग्रामीण / पोलीस उप अधीक्षक, मुख्यालय, पुणे ग्रामीण / पोलीस नोटीस - प्रसिध्दीसाठी

प्रत सादर :-मा.अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य,मुंबई.

| पोलीस शिपाई पदी नियुक्ती आदेश देण्यांत आलेल्या उमेदवारांसाठी सुचना |
|---|
| १. नियुक्ती दिलेल्या उमेदवारांनी मेस करीता ₹ ३०००/- ॲडव्हांस भरणे आवश्यक असल्याने, सदरची रक्कम येतांना बरोबर आणवी. |
| २. हजर होणा-या उमेदवांरानी त्यांच्या दैनंदिन वापरासाठी आवश्यक असलेले साहित्य उदा. गरजेनुसार आवश्यक असलेले वापरावयाचे कपडे, बाड-बिछाना, जेवणासाठी ताट,वाटी,तांब्या व बादली, मग वगैरे साहित्य बरोबर आणावे. |